**पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑर्डर ऑफ ओमान (प्रथम श्रेणी) पुरस्काराने सन्मानित (18 डिसेंबर 2025)**

18 डिसेंबर 2025

भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना ओमानचे माननीय सुल्तान हैथम बिन तारिक यांनी भारत–ओमान द्विपक्षीय संबंध दृढ करण्यात त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल तसेच त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वासाठी ‘ऑर्डर ऑफ ओमान (प्रथम श्रेणी)’ पुरस्काराने सन्मानित केले.

2. पंतप्रधानांनी हा पुरस्कार दोन्ही देशांमधील शतकानुशतकांच्या मैत्रीला समर्पित केला असून, भारतातील 1.4 अब्ज नागरिक आणि ओमानच्या जनतेमधील परस्पर जिव्हाळा, आपुलकी आणि प्रेमाचे हे गौरवपूर्ण प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

3. दोन्ही देशांमधील धोरणात्मक संबंधांना 70 वर्षे पूर्ण होत असतानाच पंतप्रधानांच्या ओमान भेटीदरम्यान त्यांना प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्काराने, या प्रसंगाला तसेच दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

4. माननीय सुल्तान काबूस बिन सईद यांनी 1970 मध्ये सुरू केलेला ‘ऑर्डर ऑफ ओमान (प्रथम श्रेणी)’ हा सन्मान सार्वजनिक जीवनात तसेच द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल निवडक जागतिक नेत्यांना प्रदान करण्यात आला आहे.

मस्कत

18 डिसेंबर 2025